I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 221-223
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतीय अर्थव्यवस्थेचा अमृत कालावधी(2022-2047) : अल्पकालीन दृष्टिक्षेप

रवींद्र बापूराव शेंडे
अर्थशास्त्र विभाग लोकमान्य महाविद्यालय ,वरोरा जिल्हा चंद्रपूर

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 | Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव भारतात प्रत्येक राज्यांनी,राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांनी,जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांनी व तालुक्यातील प्रत्येक नागरिकांनी (काही मोजके अपवाद)उत्साहात साजरा केला आणि अमृत कालावधीला(2022-2047) आरंभ झाला आहे. मिळवलेला विकास केव्हाही हातातून जाऊ शकतो आणि नवीन क्षमतांची ओळख कोविड-19 ने करून दिली आहे. विकास आणि आपत्ती यांचा जवळचा संबंध आहे,हा संबंध शास्त्रज्ञानाने सोडवून अमृत कालावधीत प्रत्येक भारतीयांना देशाला स्वयंपूर्णतेसह विकसितपणा मिळवायचा असल्यामुळे सत्तेच्या बाजूने नाही तर सत्याच्या बाजूने प्रत्येक नागरिकांनी काम करणे अपेक्षित आहे.

भारतातील रचनात्मक बदलात तंत्रज्ञानावर भर देण्यात येत असला तरी,अध्यात्म आणि विज्ञान म्हणजेच सर्वोदयाचा वापर अमृत कालावधीत अत्यावश्यक आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यातून मानवी जीवन सुखकर होत आहे हे खरे असले तरी त्याचा दुरुपयोग होत आहे. यावर आळा अमृत कालावधीत घालणे अत्यावश्यक आहे.समाजाला अवैज्ञानिक उपक्रमात गुंतवणे हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा दुरूउपयोग आहे तर,समाजाला सुशिक्षित- सुसंस्कृत- सर्जनशील होण्यासाठी विविध साधने पुरविणे हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा सदुपयोग आहे. अनेक विविधता( भाषिक, जातीय व सांस्कृतिक) सांभाळत भारताला जुने वैभव मिळवता येईल. यासाठी अमृत कलावधी एक प्रयोगशाळा ठरणारी आहे.थोडक्यात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान मदतीने सुशिक्षित, सुसंस्कृत आणि सर्जनशीलतेची व्याप्ती वाढवणे गरजेचे आहे.

**मुख्यशब्द** : अवैज्ञानिक उपक्रम,अमृत काळ, शाश्वत विकास , वैज्ञानिक प्रेरित गुंतवणूक

## प्रस्तावना :

## निवडक संशोधन साहित्याचा आढावा

पांडुरंग डापके (2022) यांनी आपल्या अर्थसंवाद मधील संशोधनात "कोणत्याही देशाचा विकास त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्या या दोन व इतर घटकांवर अवलंबून असतो.नैसर्गिक साधन संपत्तीच्या अतिवापरामुळे पर्यावरण संतुलन बिघडले आहे आणि अतिरिक्त लोकसंख्येमुळे सामाजिक सुरक्षितता धोक्यात आलेली आहे.या दोन्ही घटकाच्या पर्याप्त वापराबाबत भारतीय नागरिकांनी विचार करणे आवश्यक आहे."

## शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये

1. अमृत कालावधीत सर्व क्षेत्रातील रोजगार बाबतची अनिश्चितता दूर करणे आवश्यक आहे याचा अभ्यास करणे.

2.अमृत कालावधीत पर्याप्त लोकसंख्या निर्माण होणे आवश्यक आहे याचा अभ्यास करणे.

3.आत्मनिर्भर भारताचे असणारे स्तंभ समजून घेणे.

.4 अमृत कालावधीत नवीन शैक्षणिक धोरण 2020 महत्त्वपूर्ण साधन आहे याचा अभ्यास करणे.

## शोधनिबंधाचे गृहीतकृत्ये

1. भारतीय अर्थव्यवस्थेत सर्व क्षेत्रात अनिश्चितता वाढत जात आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन लेख दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ ,मासिके, वृत्तपत्रे, संशोधनलेख इ.साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.शोधनिबंधाच्या विश्लेषण भागात रोजगार बाबत निश्चितता, पर्याप्त लोकसंख्या, नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि काही निवडक उपाययोजना इत्यादींचे विश्लेषण आत्मनिर्भर भारताच्या अनुषंगाने करण्यात आले आहे.

## शोधनिबंधाचे विश्लेषण

भारताने अमृत कलावधीत अनेक क्षमता आणि मर्यादा लक्षात घेऊन शाश्वत विकासाचा प्रवास आत्मनिर्भरतेसह करणे आवश्यक आहे.मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भरतीची ओळख मे 2020 मध्ये नव्याने करून दिली आहे.निर्माण होणाऱ्या अनिश्चितांना आत्मनिर्भरतेमार्फत तोंड देता येत असल्यामुळे अमृत कालावधीत आत्मनिर्भरतेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**अमृत काळ आणि रोजगार निश्चितता**

मनुष्याच्या गरजा निसर्गावर अवलंबून आहे, हे लक्षात घेऊन शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास आणि विस्तार करणे आवश्यक आहे. सेवा व उद्योग क्षेत्राचा विस्तार अर्थव्यवस्थेच्या विकासाचा मुख्य कणा 21 व्या शतकात असला तरी शेती क्षेत्राचे महत्त्व नैतिक व अन्य दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.प्राथमिक अवस्थेपासून किमान नफा मिळत असतांना सुद्धा शेतीक्षेत्र रोजगार उपलब्ध करून देत आहे आणि उद्योग व सेवा क्षेत्रात प्रचंड नफा मिळत असताना सुद्धा रोजगार बाबत अनिश्चितता वाढत आहे.ही अनिश्चितता दूर होणे आवश्यक आहे.कारण सामाजिक सुरक्षितेचा प्रश्न खूप खूप मोठा आहे.केवळ उत्पन्न- नफा - रोजगार निश्चितता असा संबंध न घेता नैतिकता,कामगारांची कुशलता, सामाजिक सुरक्षितता, गुणवत्ता इत्यादींचा विचार करून रोजगार निश्चितता उद्योग व सेवा क्षेत्रात निर्माण करणे आवश्यक आहे.नफ्या-ताेट्यात सहभागी तत्व, शासन-जनता आणि उद्योजकांनी स्वीकारणे गरजेचे आहे.अमृत कलावधीत दाेनही क्षेत्रातील रोजगार अनिश्चितता दूर झाल्यास सामाजिक सुरक्षिततेसह देशाचा विकास मजबूत होणार आहे.थोडक्यात रोजगार बाबतची अनिश्चितता सर्व क्षेत्रातील दूर झाल्यास अमृत काळ सुवर्णकाळ म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत ओळखला जाणार आहे.

**अमृत कालावधी आणि पर्याप्त लोकसंख्या**

पर्याप्त लोकसंख्या अमृत कलावधीत निर्माण करणे अत्यावश्यक आहे. लोकसंख्येचे तीन प्रकार सामान्यता सांगता येते.

१.न्यून लोकसंख्या- जी लोकसंख्या असलेल्या नैसर्गिक साधनांचा वापर करू शकत नाही आणि विकासाला बाधा आणते त्या लोकसंख्येला न्यून लोकसंख्या म्हणतात.

२.अतिरिक्त लोकसंख्या- जी लोकसंख्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताण आणते आणि विकासाला अडथळा निर्माण करतात. त्याला अतिरिक्त लोकसंख्या म्हणतात.

३.पर्याप्त लोकसंख्या- जी लोकसंख्या नैसर्गिक साधन संपत्तीच्या पर्याप्त वापरातून आर्थिक विकास संतुलित करते त्या लोकसंख्येला पर्याप्त लोकसंख्या असे म्हणतात

अतिरिक्त लोकसंख्येच्या मार्फत आत्मनिर्भरता प्राप्त करणे म्हणजे पूर आलेल्या जमिनीवर तंत्रज्ञानाच्या साह्याने घर बांधल्यासारखे आहे तसेच अतिरिक्त लोकसंख्येचा साह्याने आत्मनिर्भरता निर्माण करणे म्हणजे तारेवरची कसरत आहे केव्हा देशाचा तोल जाणार हे सांगता येत नाही. त्यासाठी पर्याप्त लोकसंख्या आत्मनिर्भरतेचा मोठा अंतिम स्रोत आहे.हेच समीकरण भारतासारख्या देशाला वापरणे गरजेचे आहे. पुढील 25 वर्षांत , पर्याप्त लोकसंख्या पाहायला मिळेल असा आशावाद १५ व्या जनगणनेच्या घोषवाक्यावरून (आपली जनगणना -आपले भविष्य )यावरून नक्की करता येते.कारण बऱ्याच कामांना सरकारच्या मदतीची गरज नसते उदा. रस्त्यावरून जात असताना नळाची तोटी सुरू असल्यास ती बंद करणे अशी कृती लोकसंख्येशी आहे.वर्तमान लोकसंख्येतील लाभांश लोकसंख्येचा फायदा उचलने. शासनाची उदासीनता दूर , शक्यतो उशिरा लग्न व हम दो-हमारा एक असे वर्जन वापरल्यास भारतात अमृत कलावधीत पर्याप्त लोकसंख्या निर्माण होईल.भारतात 2011 च्या जनगणनेनुसार 121 कोटी लोकसंख्या आहे.जगात भारताचा लोकसंख्येत दुसरा क्रमांक लागतो.सध्या अस्तित्वात असलेली लोकसंख्या निसंकोचपणे अतिरिक्त आहे ,या अतिरिक्त लोकसंख्येचे सध्या फायदे उचलून तिला पर्याप्त लोकसंख्या केल्यास दीर्घकाळ हा स्रोत अधिकाधिक उपलब्धता उपलब्ध करून देऊ शकतो. पर्याप्त लोकसंख्यासाठी अमृत कलावधी एक प्रयोगशाळा ठरणारी आहे.

**आत्मनिर्भर भारताचे महत्वाचे स्तंभ**

आत्मनिर्भर भारताची भव्य इमारत पुढील पाच स्तंभावर उभी आहे.

**१.इकॉनॉमी** - अशी अर्थव्यवस्था जी टप्प्याटप्प्यांच्या बदलापेक्षा उडी घेईल.

**२.इन्फ्रास्ट्रक्चर** - असं इन्फ्रास्ट्रक्चर जे आधुनिक भारताची ओळख बनेल.

**3.भारतीय व्यवस्था** - एक अशी व्यवस्था जी मागच्या शतकाची पद्धती नाही तर एकविसाव्या शतकाची स्वप्ने साकार करणारी, तंत्रज्ञानाधारित असेल.

**४.भारतीय डेमोग्राफी** - आपल्या जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही देशातली 'व्हायब्रंट डेमॉग्राफी' ही आपली ताकद आहे. आत्मनिर्भर भारतासाठी आपल्या ऊर्जेचा स्रोत आहे.

**५.डिमांड** - आपल्या अर्थव्यवस्थेत मागणी-पुरवठ्याची जी साखळी आहे, जी ताकद आहे, ती पूर्ण क्षमतेनिशी वापरण्याची गरज आहे. देशातली मागणी वाढवण्यासाठी, ती पूर्ण करण्यासाठी आपल्या पुरवठासाखळीतील प्रत्येक भागधारकाला सशक्त करण्याची गरज आहे.

**अमृत कालावधी आणि नवीन शैक्षणिक धोरण 2020**

नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी- पालक -शिक्षक -शासन यांच्यावर कुठलाही ताण निर्माण न करता या धोरणाची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.शिक्षण म्हणजे कौशल्य मिळवण्याचे साधन, अज्ञान दूर करण्याचे साधन, अमर्याद गरजा नियंत्रित करण्याचे साधन, देशाला स्वावलंबन मिळवून देण्याचे साधन असा व्यापक अर्थ शिक्षणाचा नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे.

न्याय व समतेवर आधारीत नवसमाज निर्मीतीस शिक्षणाची कास धरणे आवश्यक आहे. कारण त्यामधून अज्ञानाचा

भस्मासूर नाहीसा होईल. ज्ञानधिष्ठीत समाजरचनेत ज्ञान काही थोडया लोकांची मक्तेदारी होणार नाही, तसे प्रत्येकाला ज्ञान मिळविण्यासाठी समान संधी प्राप्त होईल, अशा प्रकारची धोरणे नवीन शैक्षणिक धोरणात अवलंबविणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

1. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी हे अमृत कालावधीच्या सुरुवातीचे मोठे आव्हान आहे.
2. सर्वच क्षेत्रातील अनिश्चितता वाढत जात असल्याचे दिसतात.
3. गीग अर्थव्यवस्था वरवर योग्य वाटत असली तरी सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न महत्त्वाचा आहे.
4. अमृतकाळात शेतीच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे.
5. आत्मनिर्भरता हा अमृत कलावधीतील महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू आहे.
6. भारतातील संरचनात्मक बदल मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करीत नाही.
7. अमृतकाळात पर्याप्त लोकसंख्या विकासाला प्रेरणा देणार आहे .

**समारोप**

भारताने अमृत कलावधीत अनेक क्षमता आणि मर्यादा लक्षात घेऊन शाश्वत विकासाचा प्रवास आत्मनिर्भरतेसह करणे आवश्यक आहे.मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भरतीची ओळख मे 2020 मध्ये नव्याने करून दिली आहे.निर्माण होणाऱ्या अनिश्चितांना आत्मनिर्भरतेमार्फत तोंड देता येत असल्यामुळे अमृत कालावधीत आत्मनिर्भरतेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

भारतातील रचनात्मक बदलात तंत्रज्ञानावर भर देण्यात येत असला तरी,अध्यात्म आणि विज्ञान म्हणजेच सर्वोदयाचा वापर अमृत कालावधीत अत्यावश्यक आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यातून मानवी जीवन सुखकर होत आहे हे खरे असले तरी त्याचा दुरुपयोग होत आहे. यावर आळा अमृत कालावधीत घालणे अत्यावश्यक आहे.समाजाला अवैज्ञानिक उपक्रमात गुंतवणे हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा दूरूउपयोग आहे तर,समाजाला सुशिक्षित- सुसंस्कृत- सर्जनशील होण्यासाठी विविध साधने पुरविणे हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा सदुपयोग आहे. अनेक विविधता( भाषिक, जातीय व सांस्कृतिक) सांभाळत भारताला जुने वैभव मिळवता येईल. यासाठी अमृत कलावधी एक प्रयोगशाळा ठरणारी आहे.थोडक्यात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान मदतीने सुशिक्षित, सुसंस्कृत आणि सर्जनशीलतेची व्याप्ती वाढवणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

S. K. Misra, and V. K. Puri,: (2010) 'Indian Economy', Himalaya Publishing House, 28th revised edition,

Ruddar Datt and K.P.M. Sundharam: (2006), Indian Economy, S.Chand & Company Ltd. New Delhi.

Dr. C.B. Mamoria & Dr. Badri Bishal Tripathi : (2007)' Agricultural Problems of India', India Kitab Mahal, Allahabad.

M.S. Swaminathan: (2010) From Green to Evergreen Revolution, Indian Agriculture; Performance and Challenges, Academic Foundation, New Delhi.

भारताची आर्थिक पाहणी अहवाल – २०१९-२०,२०२०-२१ भारत सरकार, नवी दिल्ली.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१ अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन,

विविध वर्तमानपत्रे, विविध मासिके, शाषकीय अहवाल, मे २०२० ते एप्रिल २०२१.

Economic Survey of India and Maharashtra,2019-20 and 2020-21.

https//lokmat.news18.com

https://www.timesnowmarathi.com

https://pmyojanahindime.in

फडणवीस मृणालिनी(२०२०)विकासाचा पर्याय भांडवलवाद ? अर्थमीमांसा मासीक.

गाडगीळ गंगाधर(१९६१)नियोजन आणि समृद्धी, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.